# (६) : पश्चिम  बंगाल :

## कलकत्ता

प.बंगालची राजधानी कलकत्ता हे महानगर असून भारताच्या संपूर्ण प्रदेशातून या ठिकाणी सडक, रेल्वे आणि विमानमार्गे जाता येते. ब्रिटिशांची प्रथम राजधानी कलकत्ता होती. भारतीय स्वतंत्रता आंदोलन, साहित्य, संस्कृती यांचे हे प्रमुख केंद्र आहे. या ठिकाणी जैन समाज मोठ्या प्रमाणात आहे. शहरात अनेक जैन मंदिरे आहेत.

(१) बड- मंदिर - बडा बाजार (बैसाख लेन) भव्य व कलात्मक असे मंदिर आहे.

(२) चावलपट्टी मंदिर

(३) बेलगाछिया विभागात एका विशाल बगीचेमध्ये भ. पार्श्वनाथाचे भव्य असे मंदिर आहे.

(४) रायबद्रीदासचे मंदिर- हे श्वेतांबरांचे जैन मंदिर असून सौंदर्यपूर्ण कलात्मक असे आहे व ते पर्यटकाचे आकर्षक केंद्र आहे.

(५) जुने बाडी मंदिर.

प्रतिवर्ष कार्तिक शुध्द १५, पौर्णिमेस ग्रथील आखिल जैन समाज बेलगाछिया मंदिरात खूप मोठा उत्सव साजरा करतात.

प्रेक्षणीय स्थळे: मेट्रो रेल्वे ( भुयारी रेल्वे), प्राणीसंग्रहालय, हावडा ब्रीज, नॅशनल लायब्ररी, रविंद्र भारती, शाहिद मिनार, कालीघाट (देवी) मंदिर, बेलुरमठ.

सुविधा: रेल्वे स्टेशनपासून २ कि.मी दूर अंतरावर बैसाक स्ट्रीट मध्य बाडाबाजार येथे सर्व सुविधायुक्त धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र  - पागबिरा- पुरू लिया

मार्ग:  हे स्थान इसरी- बोकारो- पुरोलिया मार्गावर असून पुरू लिया शहरापासून ५३ कि.मी दूर पागबिरा गावात १२०० वर्षापूर्वीचे प्राचीन मनोज्ञ भ. आदिनाथ व भगवान शांतीनाथ यांच्या प्रतिमा जिनमंदिरात विराजमान आहे.तिर्थयात्रेसाठी आवर्जून हे स्थान पाहिले पाहिजे.